


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड-महाराष्ट्र | बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ४१ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये




RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com







# एकनाथ शिंदेंना सरकारमधूनच मोठा धक्का, आणखी एक निर्णय रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदेंनी सुरु केलेल्या योजना बंद केल्या जात होत्या. आता एकनाथ शिंदेंनी मंजुरी दिलेले प्रकल्पही बंद केले जाऊ लागलेत. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सुरु केलेल्या १४ तलाव संवर्धनाचा प्रकल्प बासनात गुंडाळण्यात आलाय. पर्यावरणमंत्री पंकजा मुंडेंनी हा निर्णय घेतलाय. तलाव संवर्धन प्रकल्प बंद केल्यानं एकनाथ शिंदेंना हा मोठा धक्का मानला जातोय.




एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक योजना सुरु केल्या होत्या. मुख्यमंत्रिपदावरुन पायउतार झाल्यानंतर त्यांच्या अनेक योजना गुंडाळण्यात आल्या. आता तर त्यांनी मंजुरी दिलेले प्रकल्पच रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आलीये. पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मंजूर केलेली १४ तलाव संवर्धनाची योजनाच रद्द केलीये.

ही योजना २४४.१५ कोटी रुपयांची होती. त्यापैकी ७३.३१ कोटी रुपये आधीच वितरित करण्यात आले होते. काही ठिकाणी तलाव संवर्धनाचं कामही सुरु झालं होतं. तरीही प्रशासकीय प्रक्रिया अपूर्ण असल्याचं सांगत ही योजना रद्द करण्यात आली.

आधी शिंदेंच्या कार्यकाळात सुरु झालेल्या योजना बंद केल्यानंतर आता शिंदेंनी मंजूर ▶▶ उर्वरित पान २ वर

## ● 'योग्य वेळी सगळं बोलेन, मी हिशोबाला चोख आहे' – एकनाथ शिंदे

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत इतिहास घडवला आहे. पण जे काही राजकारण झालं ते खालच्या पातळीचे झाले. योग्य वेळी सगळं बोलेन, मी हिशोबाला चोख आहे. मी कोणाच्या अडग्यात जात नाही पण जर कोणी गेले तर त्याला सोडत नाही असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. साताऱ्यात तुम्ही इतिहास घडवला आहे. पूर्वी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. पण आता सातारा बदलला आहे. काम करणाऱ्या माणसाच्या मागे उभं राहण्याचा निर्णय तुम्ही घेतला आहे. शिवसेनेचा कार्यकर्ता दिलेला शब्द पाळणारा असतो. मी एकदा शब्द दिला की माघार नाही. कमिटमेंटका दुसरा नाम एकनाथ शिंदे आहे असं मी मस्करीत म्हणतो. राजकारणात समाजकारणात शब्दाशिवाय काही नाही. सत्ता येते, जाते, पदं येतात, जातात...पण नाव गेलं की परत येत नाही. ते कमवायला खूप वेळ लागतो. गमवायला वेळ लागत नाही. संपत्ती, पैसा किती कमावला यापेक्षा माणसं किती कमवली, प्रेम किती कमावलं हे महत्त्वाचं आहे. म्हणून बाळासाहेबांचे विचार, आनंद दिघे यांचे विचार घेऊन पुढे जात आहोत.

## हाय अलर्ट जारी...



२९ एप्रिल ते १२ मे दरम्यान, सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कोणत्याही व्यक्तीने (उघड्या आकाशाखाली) बाहेर जाऊ नये, कारण हवामान विभागाने सांगितले आहे की तापमान ४५ओउ ते ५५ओउ पर्यंत जाऊ शकते. त्यामुळे जर कोणाला घुसमटल्यासारखे वाटले किंवा अचानक तब्येत बिघडली तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. घरातील दरवाजे उघडे ठेवा जेणेकरून वायुवीजन होईल. मोबाईलचा वापर कमी करा, मोबाईल फुटण्याची शक्यता असू शकते. कृपया सावध रहा आणि इतरांना माहिती द्या. शक्यतो दही, ताक, बेलफळाचा रस इत्यादी थंड पेयांचा वापर करा.

अत्यंत महत्त्वाची माहिती– नागरिक संरक्षण महासंचालनालय नागरिकांना आणि रहिवाशांना पुढील बाबींविषयी इशारा देत आहे. ४७ओउ ते ५५ओउ दरम्यान वाढणारे तापमान आणि पुढील काही दिवसांत क्युम्युलस ढगांच्या उपस्थितीमुळे बहुतांश भागात उष्ण व दमट वातावरण निर्माण होईल. त्यामुळे खालील सूचना व काळजी घ्यावी: कारमधून काढून टाकावयाच्या वस्तू:

१. गॅस साहित्य
२. लाईटर
३. कार्बोनेटेड पेये
४. परफ्यूम व बॅटरी असलेली उपकरणे
५. कारच्या खिडक्या थोड्या उघड्या ठेवा (वायुवीजनासाठी)
६. कारची इंधन टाकी पूर्ण भरू नका
७. संध्याकाळी इंधन भरा
८. सकाळी कारने प्रवास टाळा
९. टायर जास्त फुगवू नका, विशेषत: प्रवासादरम्यान विंचू आणि साप यांच्यापासून सावध रहा, कारण ते त्यांच्या बिळातून बाहेर येऊन थंड जागा शोधण्यासाठी बागेत किंवा घरात येऊ शकतात. पुरेसे पाणी आणि द्रवपदार्थ प्या. गॅस सिलिंडर उन्हात ठेवू नका. वीजमीटरवर जास्त भार टाकू नका. घरातील वापरात असलेल्या भागातच एसी वापरा, विशेषत: उन्हाळ्यात. दोन ते तीन तासांनी ३० मिनिटे विश्रांती घ्या. बाहेर तापमान ४५–४७ओउ असताना घरातील एसी २४–२५ओउ वर ठेवा, त्यामुळे आरोग्य चांगले राहील. विशेषत: सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान थेट सूर्यप्रकाश टाळा.

शेवटी: कृपया ही माहिती इतरांपर्यंत पोहोचवा, कारण अनेकांना ही माहिती पहिल्यांदाच मिळत असेल. – नागरिक संरक्षण महासंचालनालय

# मस्साजोग सरपंचपदासाठी दुपारपर्यंत ५० टक्के मतदान

## दोन गटांत शाब्दीक चकमक, पोलिसांचा वेळीच हस्तक्षेप



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील सरपंच पदाच्या निवडणुकीसह बीड जिल्ह्यातल्या १२ सरपंच आणि १९ सदस्य अशा एकूण ३१ रिक्त जागांसाठी आज मतदान होत असून अवघ्या राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या मस्साजोग येथे मोठ्या कडेकोट बंदोबस्तात मतदानाला सुरुवात झाली आहे. दुपारी एक वाजेपयरत ५० टक्के यांच्या आसपास मतदान झाले होते. मतदान प्रक्रियेच्या दरम्यान दोन्ही गटामध्ये शाब्दीक चकमक उडाल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत दोन्ही गटांना शांत केले. संतोष देशमुख यांची हत्या झाल्याने तेथील सरपंचपदाची जागा रिक्त झाली होती. बीड जिल्ह्यातल्या १२ सरपंच आणि १९ सदस्यांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषीत झाला. या वेळी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख या निवडणूक रिंगणात उतरल्या. त्यापाठोपाठ त्यांना स्वरुपानंद देशमुख यांनी आव्हान दिले. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर आज प्रत्यक्षात मस्साजोगमध्ये सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये तीन मतदान केंद्र उभारण्यात आले असून कुठलाही अनुचीत प्रकार होऊ नये यासाठी पोलीस प्रशासन सतर्क असल्याचे दिसून येते. मतदान केंद्राच्या बाहेर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. मात्र यास्थितीतही मतदान केंद्र परिसरात दोन्ही गटांमध्ये बाहेरून मतदान आणल्णयावरून वाद झाला. शाब्दीक चकमक झाली. पोलिसांनी वेळीच दोन्ही गटांना शांत केले. दुपारपर्यरत मस्साजोगमध्ये प्रभाग क्र. एक ३९८, प्रभाग क्र. दोन ३२८, तर प्रभाग क्र. तीनमध्ये ३४२ मतदान झाले होते. अन्य जागांसाठी गेवराई तालुक्यात सर्वाधिक सहा ग्रामपंचायतींमध्ये तर परळीत चार, बीडमध्ये तीन, माजलगाव, पाटोदा व आष्टी ▶▶ उर्वरित पान २ वर

# अजित पवारांचा अपघात झाला त्या कंपनीच्या विमानात पार्थ पवार बसलेच कसे ?

## पैसा कोणाचा? अंजली दमानियांचा सवाल!

**मुंबई । प्रतिनिधी**

बारामती विमानतळाजवळ अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला होता. या अपघातात अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला होता. अपघात झालेले विमान हे तठड कंपनीच्या मालकीचे होते. अनेकांनी या अपघातावर संशय व्यक्त केला असून विमान कंपनीवरही शंका उपस्थित केला होती.या प्रकरणी सध्या तपास सुरू आहे. अशातच आता अजित



पवार यांचे सुपुत्र आणि खासदार पार्थ पवार यांनी तठड कंपनीच्या विमानातून प्रवास केल्याचे समोर आले आहे. यावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

पार्थ पवार यांच्या विमान प्रवासावर बोलताना अंजली दमानिया यांनी म्हटले की, ज्या तडठ कंपनीच्या विमान अपघातात तीन महिन्यापूर्वी वडिलांचा मृत्यू झाला, त्याच विमानात मुलगा जातो ? त्या तडठ कंपनी च्या चौकशीची मागणी करायचे सोडून, त्याच विमानात पार्थ पवार निर्धास्तपणे जातो ? ▶▶ उर्वरित पान २ वर

# पाली, बोरखेड, नाळवंडीत मतदानाचा उत्साह

## गुलाल कुणाचा ? बुधवारी तहसील कार्यालयात फैसला

**बीड । प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशानुसार बीड तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम प्रशासनाकडून अत्यंत चोखपणे राबवण्यात आला . या प्रक्रियेत सहा ग्रामपंचायतींमध्ये केवळ एकच अर्ज प्राप्त झाल्याने तेथे मतदानाची गरज भासली नाही , तर उर्वरित तीन ग्रामपंचायतींसाठी २८ एप्रिल रोजी नऊ मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पडली . यामध्ये पाली ६७, बोरखेड ६३ तर नाळवंडी ६५



टक्के मतदान झाल . सहा ठिकाणी मतदानाची गरज उरली नाही . निवडणूक जाहीर झालेल्या नऊ ग्रामपंचायतींपैकी साखरे बोरगाव , वांगी , पिंपळनेर , तांदळवाडी भिल्ल आणि सावरगाव घाट या पाच ठिकाणी सदस्य पदासाठी प्रत्येकी केवळ एकच नामनिर्देशन पत्र दाखल झाले . तसेच घोसापुरी येथे सरपंच पदासाठी देखील एकच वैध नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्याने , ▶▶ उर्वरित पान २ वर

# पोलीस कस्टडीतील मृत्यू की खून ?

## केज पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी तीव्र

**बीड । प्रतिनिधी**

केज पोलीस स्टेशन आधीच राज्यभर चर्चेत असताना आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. केज तालुक्यातील तरुण आशिष धिवार यांचा पोलीस कस्टडीमध्ये झालेल्या कथित मारहाणीमुळे बीड जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, हा मृत्यू नसून थेट खून असल्याचा आरोप होत आहे.

रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम वीर यांनी कठोर



भूमिका घेत, केज पोलिसांवर तात्काळ खुनाचा गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी केली आहे. हा साधा मृत्यू नाही, तर पोलीस अत्याचाराचा परिणाम आहे. दोषींना वाचवण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, मयत आशिष धिवार यांच्या कुटुंबीयांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला असून, न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आधी गुन्हा दाखल करा, मगच अंत्यसंस्कार, अशी त्यांची ठाम भूमिका आहे. याशिवाय, कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची मागणी, पोस्टमार्टम ▶▶ उर्वरित पान २ वर



# सुख आणि सुविधा : जीवनाच्या प्रवाहातील दोन वेगळे किनारे

जीवनाच्या वाटेवर चालताना प्रत्येक माणूस एका अदृश्य शोधात असतो – तो शोध म्हणजे सुखाचा. परंतु या सुखाच्या शोधात आपण अनेकदा सुविधांच्या जंगलात हरवून जातो. आजचा काळ हा वेगाचा, स्पर्धेचा आणि साधनसंपत्तीचा काळ आहे. हातात स्मार्टफोन, घरात आधुनिक उपकरणे, दारात वाहन – सर्व काही उपलब्ध आहे. पण तरीही मनात एक पोकळी जाणवते. जणू काही सर्व काही असूनही काहीतरी कमी आहे. मराठीत एक म्हण आहे – सुख हे मनाचे, दुःखही मनाचे.

म्हणजेच बाह्य सुविधा आणि अंतर्गत समाधान यात मोठा फरक आहे. उर्दूत एक ओळ आहे – सुकून वो नहीं जो चीज़ों से मिले, सुकून वो है जो दिल से निकले. या एका वाक्यात संपूर्ण जीवनतत्त्वज्ञान दडलेले आहे. आजच्या युगात सुविधा म्हणजेच सुख असा गैरसमज समाजात वाढताना दिसतो. मोठे घर, महागडी कार, एसी ऑफिस – हेच सुखाचे मापदंड झाले आहेत. पण संत तुकाराम म्हणतात – आनंदेचे डोही आनंद तरंग, म्हणजे आनंद हा बाहेर नसून आपल्या अंतर्मनात आहे. हिंदी चित्रपटातील एक प्रसिद्ध ओळ आहे – ज़िंदगी बड़ी होनी चाहिए, लंबी नहीं. जीवनाची गुणवत्ता महत्त्वाची, केवळ साधनसंपत्ती नव्हे. सुविधा ही जीवन सुलभ करतात, पण त्या आनंद देतातच असे नाही. त्या केवळ बाह्य परिस्थिती सुधारतात ; अंतःकरणातील शांतता मात्र वेगळी गोष्ट आहे. मानवाने प्रगतीच्या नावाखाली सुविधा निर्माण केल्या. चूल–मातीपासून ते मायक्रोवेव्हपर्यंत, बैलगाडीपासून ते बुलेट ट्रेनपर्यंत – हा प्रवास निश्चितच अभिमानास्पद आहे. पण या प्रवासात आपण सुखाची व्याख्या बदलली. पूर्वी दोन वेळचे अन्न, कुटुंबाची साथ आणि मन:शांती यालाच सुख मानले जायचे. आज मात्र जितनी चादर हो उतने ही पैर फैलाओ ही साधी म्हण आपण विसरलो आहोत. अधिक मिळवण्याच्या हव्यासात आपण स्वतःलाच हरवत आहोत. उर्दू शायरीत एक ओळ आहे – हसरतें बढ़ती गईं, सुकून घटता गया. जितक्या इच्छा वाढतात तितका मनाचा शांतपणा कमी होत जातो. सुविधा आणि सुख यांच्यातील मूलभूत फरक समजून घेणे आज अत्यंत आवश्यक आहे. सुविधा या बाह्य आहेत – त्या वस्तूंमध्ये, तंत्रज्ञानात आणि परिस्थितीत असतात. सुख मात्र अंतर्मनात असते – ते अनुभवावे लागते. एखाद्या गरीब माणसाकडे सुविधा नसतील, पण तो समाधानी असेल, तर तो खऱ्या अर्थाने सुखी आहे. याउलट, सर्व सुविधा असलेल्या व्यक्तीला जर मन:शांती नसेल, तर तो खऱ्या अर्थाने सुखी नाही. कबीरदास म्हणतात – माया मरी न मन मरा, मर मर गया शरीर. माणूस बाह्य गोष्टींमध्ये अडकून राहतो, पण अंतःकरणातील असंतोष संपत नाही.

आजच्या जीवनशैलीत आपण सतत धावत आहोत – अधिक पैसा, अधिक प्रतिष्ठा, अधिक सुविधा मिळवण्यासाठी. पण या धावपळीत आपण स्वतःलाच विसरत चाललो आहोत. मराठीत एक म्हण आहे – धावपळीत मन हरपलं. खरंच, या वेगवान जीवनात मनाला विश्रांती देण्याची गरज आहे. हिंदी गाण्यातील ओळ आठवते – ये दौलत भी ले लो, ये शोहरत भी ले लो, भले छीन लो मुझसे मेरी जवानी मगर मुझको लौटा दो बचपन का सावन. बालपणीचे साधे सुख, निरागस हसू – ही खरी संपत्ती होती, जी आजच्या सुविधांमध्ये हरवली आहे.

उर्दूतील एक सुंदर म्हण आहे – कम में भी गुज़ारा हो जाए, वही असली दौलत है. कमी गोष्टींमध्ये समाधान मानणे हीच खरी श्रीमंती आहे. पण आजचा समाज अधिक या शब्दाच्या मागे लागला आहे. अधिक पैसा, अधिक वस्तू, अधिक सुख – पण या अधिकच्या मागे धावताना आपण पुरेसे या शब्दाचा विसर पाडला आहे. संत ज्ञानेश्वरांनी सांगितले – जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे, म्हणजेच समाधान आणि ज्ञान वाटण्यात आहे, साठवण्यात नाही.



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार बीड**

सुख आणि सुविधा यांचा समतोल साधणे हीच खरी जीवनकला आहे. सुविधा नाकारायच्या नाहीत, पण त्यांना सुखाचा पर्याय समजायचेही नाही. तंत्रज्ञानाचा उपयोग जीवन सुलभ करण्यासाठी करावा, पण त्याच्यात अडकून पडू नये. आज मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया – या सर्व सुविधा आहेत ; पण त्यांच्यामुळे नाती दूर जात असतील, संवाद कमी होत असेल, तर त्या सुविधा आपल्याला सुखापासून दूर नेत आहेत. एक हिंदी ओळ आहे – रिश्तों में दूरी आ गई, स्क्रीन के करीब आते–आते. ही परिस्थिती आज प्रत्येक घरात दिसते.

खरे सुख हे साधेपणात असते. गावाकडच्या शांत वातावरणात, कुटुंबासोबत घालवलेल्या वेळेत, मित्रांसोबतच्या गप्पांमध्ये – हेच खरे आनंदाचे क्षण आहेत. उर्दू शायरीत म्हटले आहे – सादगी में जो मज़ा है, वो शानो–शौकत में कहाँ. साधेपणातील आनंद हा वैभवात मिळत नाही. मराठी गाण्यातील ओळही तेच सांगते – जीवनातली साधी सुखं, तीच खरी श्रीमंती.

आजच्या काळात मानसिक आरोग्याचा प्रश्न मोठा बनला आहे. कारण सुविधा वाढल्या, पण समाधान कमी झाले. स्पर्धा, अपेक्षा, तुलना – या गोष्टींनी मनावर ताण वाढवला. सुखाचा शोध घेताना आपण स्वतःलाच हरवत आहोत. म्हणूनच आज गरज आहे ती स्वतःकडे परत येण्याची. स्वतःला समजून घेण्याची, आपल्या गरजा आणि इच्छा यामध्ये फरक ओळखण्याची.

महात्मा गांधी म्हणाले होते – पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा पूर्ण करू शकते, पण प्रत्येकाच्या हव्यासासाठी नाही. ही ओळ आज अधिक महत्त्वाची वाटते. सुविधा ही गरज भागवण्यासाठी असावी, हव्यास वाढवण्यासाठी नव्हे. सुख हे मिळवायचे नसते, ते अनुभवायचे असते. ते बाहेर शोधायचे नसते, ते आत सापडते.

शेवटी, सुख आणि सुविधा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत – एक बाह्य, दुसरे अंतर्मनातील. सुविधा जीवन सुलभ करतात, पण सुख जीवन अर्थपूर्ण करते. म्हणूनच जीवनाच्या प्रवासात सुविधा मिळवा, पण सुख हरवू देऊ नका. मन प्रसन्न असेल तरच जीवन सुंदर वाटते – ही साधी गोष्ट लक्षात ठेवली, तरच खऱ्या अर्थाने आपण सुखी होऊ शकतो.

◆ पान 9 वरून पुढे...

## एकनाथ शिंदेंना....

केलेले प्रकल्पही बंद केल्यानं नाराजी व्यक्त करण्यात येतेय. माजी मंत्री दीपक सावंतांनी थेट नाराजी व्यक्त केली नसली तरी प्रकल्प बंदचा निर्णय का घेतला ? हे पंकजा मुंडेंना विचारावं असं त्यांनी म्हटलंय.एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक योजना सुरु केल्या. शिंदेंचं मुख्यमंत्रिपद गेल्यानंतर पुढं या योजना टप्प्याटप्प्यानं बंद करण्यात आल्या.

### कोणत्या योजना बंद ?

आनंदाचा शिधा, माझी शाळा सुंदर शाळा, योजनादूत, १ रुपयात पीक विमा, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, एक राज्य एक गणवेश योजना, लाडका भाऊ अप्रेंटिसशीप योजना अशी मोठी यादी आहे. पर्यावरणमंत्री पंकजा मुंडेंनी घेतलेल्या निर्णयाबाबत मुख्यमंत्र्यांना विचारलं असता त्यांनी माहिती घेऊन सांगतो असं सांगत अनभिज्ञता दाखवली. एकनाथ शिंदेंच्या योजना आणि प्रकल्पांना कात्री लावली जात असल्यानं तोंड दाबून बुक्क्यांचा मार दिल्यासारखी परिस्थिती शिवसैनिकांची झाल्याचं बोलण्यात येतंय. शिवसेना यावर थेट बोलत नसली तरी शिवसैनिकांमधील नाराजी मोठ्या प्रमाणात वाढल्याचं सांगण्यात येतंय.

## मस्साजोग सरपंचपदासाठी...

तालुक्यात प्रत्येकी दोन, धारूर, केज, वडवणी आणि शिरूर कासार प्रत्येकी एक ग्रामपंचायतीसाठी मतदान होत आहे. जिल्ह्यात एकूण ५९ मतदान केंद्रांवर ही मतदान प्रक्रिया सुरू असून या पोटनिवडणुकीत एकूण ३७ हजार ९६६ मतदार आपल्या मताचा हक्क बजावणार आहेत. सकाळी साडेसात वाजल्यापासून या सर्व जागांसाठी मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे.

## अजित पवारांचा....

सुनेत्रा पवारांचे जडऊ, राम चौबे आणि विकास पाटील, जे सरकारी अधिकारी आहेत आणि सरकारी पगार घेतात, ते पुन्हा एकदा पवारांच्या घरासाठी काम करत आहेत ? मी पुन्हा एवढ्यासाठी म्हणत आहे कारण, हेच ते दोघे जे पुणे मुंढवा जमीन प्रकरणात पार्थच्या बाजूने उभे होते. तेव्हा अजित पवारांचे झ–, आता सुनेत्रा पवारांचे. प्रश्न साधे आहेत, सरकारी अधिकारी खाजगी कामासाठी कसे जाऊ शकतात ? चार्टर फ्लाइटचे पैसे कुणाच्या खिशातून ? आणि तडठ च्या त्याच विमानात पार्थ पवार बसले तरी कसे ? उत्तरं जनतेला हवीत. रोहित पवारांचा गंभीर आरोप– आज आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत खळबळजनक दावा केला आहे. अजित पवार ज्या विमानाने प्रवास करत होते ते विमान तडठ कंपनीचे आहे, ज्याचे मालक व्ही के सिंग आहेत. याबाबत बोलताना रोहित पवार यांनी म्हटले की, 'अजित दादांचा अपघात सकाळी झाला तेव्हा व्ही के सिंगला बक्षीस म्हणून ९ कोटी ८१ लाख रुपये दिले, तर दुसऱ्या दिवशी म्हणजे अजित दादांचा अंत्यविधी सुरू होता तेव्हा १६ कोटी ८८ लाख रुपये दिले. आतापर्यंत १४५ कोटी सिंग ला दिले आहेत.'

## पाली, बोरखेड....

या ठिकाणी निवडणूक घेण्याची आवश्यकता भासली नाही . दुसरीकडे, साखरे बोरगाव येथील सरपंच पदासाठी वैध अर्ज असणाऱ्या उमेदवाराचे दुर्दैवी निधन झाल्याने जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशानुसार येथील निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे .

पाली, बोरखेड आणि नाळवंडीत शांततेत मतदान : पाली, बोरखेड आणि नाळवंडी या तीन ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात आज मतदारांनी आपला हक्क बजावला . या प्रक्रियेसाठी २३ एप्रिल रोजीच मतपेट्यांचे सीलिंग करण्यात आले होते . मंगळवारी सकाळी ७:३० ते सायंकाळी ६:३० या वेळेत मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पडली . या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अरुण मोरे (पाली) , कल्याण शेळके (बोरखेड ) आणि विनायक येळंबकर (नाळवंडी) यांनी जबाबदारी सांभाळली.

तहसीलदार व नायब तहसीलदारांचे सूक्ष्म नियोजन :– ही निवडणूक प्रक्रिया यशस्वी करण्यामागे प्रशासकीय यंत्रणेचे विशेष नियोजन आहे . चंद्रकांत शेळके ( तहसीलदार बीड )तथा निवडणूक निर्णय प्राधिकृत अधिकारी म्हणून त्यांनी सर्व कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींचे नेतृत्व केले . त्यांच्या अचूक नियोजनामुळे संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पडली . सुहास हजारे , निवासी नायब तहसीलदार यांनी निवडणूक समन्वय अधिकारी म्हणून त्यांनी मतदान केंद्रांवरील व्यवस्था , कर्मचाऱ्यांचे नियंत्रण आणि तांत्रिक बाबींचे यशस्वी संचलन केले .

प्रशासकीय सहकार्य आणि निकालाची उत्सुकता :– या महत्त्वपूर्ण कामकाजात महादेव चौरे , संतोष मुळीक , तुकाराम जाधव आणि विवेक कोळपकर यांनी सक्रिय सहभाग नोंदवत निवडणूक यंत्रणेला मोलाचे सहकार्य केले . आज मतदान झालेल्या तीनही ग्रामपंचायतींची मतमोजणी दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी तहसील कार्यालय बीड येथे पार पडणार आहे . आता कोणाच्या गळ्यात विजयाची माळ पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

## पोलीस कस्टडीतील....

इन–कॅमेरा पद्धतीने, बाहेरील जिल्ह्यातील डॉक्टरांकडून करण्याची मागणी, हीही पुढे करण्यात आली आहे. या घटनेची दखल घेत, रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर लवकरच केज येथे भेट देणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे केज पोलिसांविरोधात प्रचंड रोष निर्माण झाला असून, नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. आता प्रशासन या गंभीर आरोपांवर काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## कवडगाव येथे सीसीटीव्ही...

चोरांवर आत्ता सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर असणार आहे. या सीसीटीव्ही कॅमेरे महत्त्वाच्या चौकामध्ये लावण्यात आले आहेत या कॅमेऱ्यामुळे चोरांनसह गावामध्ये भांडणे खेळणारे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर देखील या कॅमेऱ्याची नजर असणार आहे. यामुळे पोलिसांना गुन्हेगार शोधण्यासाठी मोठा पुरावा उपलब्ध होणार आहे. या कामामुळे गावचे सरपंच शेख बशीर भाई यांचे सर्व गावातून कौतुक केले जात आहे.

## पोलीस अधिकाऱ्याचा...

५०६, आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्याचे कलम 3(1)(w)(i), 3(1)(w)(ii), 3(2)(va) प्रमाणे नोंद झालेला होता. त्यानंतर सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक, (A.S.P) माजलगांव यांच्याकडे देण्यात आला होता आणि यामध्ये विशेष बाब म्हणजे सदर अधिकारी हे आय.पि.एस. (I.P.S) होते. परंतु गुन्हा हा विशेष कायद्याच्या कलमासह नोंद झालेला असतानाही योग्य तपास होत नसल्याने तपास अधिकारी बदलण्यात यावा या बाबत पिडीतेने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे क्रिमिनल रिट पेटीशन क्रं. ६१६/२०२३ दाखल केले असता तपास अधिकारी मा. उच्च न्यायालयात हजर झाले नाही व त्यानंतर तपास अधिकारी यांनी विशेष व सत्र बी समरी अहवाल दाखल केल्याबाबतची माहिती मा. उच्च न्यायालयासमक्ष आली असता दिनांक २९–०४–२०२४ रोजीच्या अंतिम आदेशांत पोलिसांच्या तपास अहवालास विरोध करण्याचा याचिकाकर्तीला पूर्ण अधिकार आहे, त्यासाठी त्या योग्य ती कायदेशीर पावले उचलू शकतात यासह ईतर कायदेशीर बाबी नमूद करीत सदर क्रिमिनल रिट पेटीशन मा. उच्च न्यायालयामार्फत निकाली निघालेले होते. प्रस्तुत प्रकरणांत पहिल्यांदा तपास अधिकारी मार्फत जिल्हा विशेष व सत्र न्यायालय माजलगांव येथे अहवाल दाखल करण्यात आल्यानंतर काही कालावधीने तो अहवाल तालुका केज येथील जिल्हा विशेष व सत्र न्यायालयात वर्ग झालेला होता ; यामुळे पिडीत महिला फिर्यादी यांनी त्यांचे वकील ड. कपिलकुमार विष्णुपंत बेदरे मार्फत न्यायालयांत हजर होवून तपास अहवाल संबधी लेखी म्हणणे तसेच विरोध याचिका (प्रोटेस्ट पेटीशन) दाखल केले ; ज्यामध्ये भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता व अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध सुधारणा) अधिनियम, २०१५ या अन्वये तपासासंबधी अत्यावश्यक कार्यप्रणालीचे पालन न करताच चुकीचा तपास करून आश्चर्यकारकपने दिनांक २०–०३–२०२३ रोजी केवळ १३ दिवसांत तपास पूर्ण केल्याची नोंद करवून पोलीसांनी तपास अहवाल कोर्टात पाठविण्यात आल्याची बाब न्यायालयासमक्ष मांडण्यात आली आणि अनेकदा कायदेशीर युक्तिवाद देखील करण्यात आला. त्यानंतर दिनांक ३०–०३–२०२६ रोजी केज येथील मा. जिल्हा विशेष व सत्र न्यायालयाने या प्रकरणांत अंतिम न्यायनिर्णय घोषित करीत 'बी' समरी अहवाल फेटाळत तो नामंजूर केला आणि प्रस्तुत गुन्ह्याचा पूर्ण तपास पुनः करण्याचे पोलीसांना आदेशित केलेले आहे. या निकालामुळे पिडीत महिला फिर्यादीस अखेर ३ वर्षानंतर न्याय मिळाला आहे. या पूर्ण कोर्ट केसमध्ये पिडीत फिर्यादीतर्फे मुख्य वकील म्हणून ड. कपिलकुमार विष्णुपंत बेदरे यांनी मा. विशेष व सत्र न्यायालय, केज यांच्यासमक्ष अत्यंत प्रभावीपणाने काम पाहत कायदेशीर भक्कम बाजू मांडली व त्यांना ड. शरद दत्तात्रय कोठावळे, ड. अरविंद बन्सी काळकुटे, ड. सिद्धार्थ मधुकरराव वारे यांनी सहकार्य केले.

## सोमवारी लोकशाही....

आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे, आपले सरकार व पी.जी.पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीच्या अंतिम अहवालासह वेळेवर उपस्थित राहावे.

## महाराष्ट्र आरोग्य....

संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी केले. द्वितीय वर्षात प्रथम क्रमांक मिळवणारी प्रियांका कोळी म्हणाली की, महाविद्यालयात अभ्यासासाठी समृद्ध ग्रंथालय आणि वाचनालयाची उत्तम सोय आहे. शांत वातावरण आणि उपलब्ध संदर्भग्रंथांमुळे आम्हाला परीक्षेची तयारी करणे सोपे झाले. तर तृतीय वर्षात प्रथम क्रमांक मिळवणारी माधुरी सुरवसे म्हणाली की, अनुभवी शिक्षक आणि त्यांनी वेळोवेळी केलेले योग्य मार्गदर्शन यामुळेच आम्ही हे यश मिळवू शकलो. कठीण विषय सोपे करून शिकवल्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला. केवळ अभ्यासच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना उत्तम आरोग्यदूत म्हणून घडवणे हेच आमचे ध्येय आहे. –डॉ. आदिती सारडा, संचालिका, आदित्य शिक्षण संस्था. ग्रामीण भागातील मुले आव्हानात्मक क्षेत्रात प्रगती करत आहेत– विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल बोलताना आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा म्हणाले की, गुणवंत विद्यार्थी, अनुभवी प्राध्यापक आणि अत्याधुनिक सुविधांचा संगम यामुळेच हे यश शक्य झाले आहे. ग्रामीण भागातील मुले फिजिओथेरपीसारख्या आव्हानात्मक क्षेत्रात प्रगती करत आहेत, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

## जिल्ह्यामध्ये मनाई...

उपोषण, मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा–या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि.११ मे २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा–या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा–या कर्मचा–यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा–या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका–यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## कुस्ती स्पर्धेच्या....

मार्गदर्शनात स्पर्धेचे भव्य असे आयोजन करण्याचे निश्चित केले. सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या पुरुष व महिला खेळाडू, पंच, सामनाधिकारी, प्रशिक्षक, व्यवस्थापक यांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्पर्धा आयोजना बाबतची बैठक होणार आहे. सदर बैठकीस छत्रपती संभाजीनगर विभागाचे क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर, बीड जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे सचिव तथा महाराष्ट्र केसरी सय्यद चाऊस, तालुका क्रीडा अधिकारी संदिप ढाकणे, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, जितेंद्र आरक आदी. उपस्थित होते. सदर स्पर्धेमुळे बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राला चालना मिळणार असून स्थानिक स्तरावर क्रोडा संस्कृतीला प्रोत्साहन मिळेल असा विश्वास जिल्हाधिकारी यांनी विवेक जॉन्सन व्यक्त केला.

## अजित दादांच्या....

वाटप करण्यात आले. नागरिकांनीही या उपक्रमाला उदंड प्रतिसाद दिला. या भव्य अभियानाचे संपूर्ण नियोजन 'एक झाड एक जीवन' अभियानाच्या प्रमुख तेजस्विनी पवार यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली वाटलेले प्रत्येक झाड जगवण्याची जबाबदारी आता नागरिकांनी आणि ग्रामस्थांनी घेतली आहे. निसर्गाचे संवर्धन करणे आणि समाजातील उपेक्षितांना आधार देणे, हीच अजित दादांसारख्या 'शब्दाच्या पक्क्या' आणि कर्तृत्ववान नेत्याला दिलेली खरी जिवंत मानवंदना ठरेल, अशी माहिती संस्थेचे सचिव तेजस पवार यांनी दिली. याप्रसंगी संस्थेचे सचिव तेजस पवार, सदस्य रोहन डोळस आणि बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

–विकासाचा महामेरू तू, होतास गरिबांचा आधार,
–शब्दाला जागून निभावला, तू लोकांसाठी प्रत्येक भार.
–नियतीने अचानक घात केला, अन् डोळ्यांत उरले पाणी,
–तुझ्याविना या तीन महिन्यांत, अधुरीच राहिली कहाणी.
–पण आठवणींचे झाड तुझे, आम्ही असेच जपू मनात,
–तुझी सावली लाभेल आता, इथल्या पानापानात.
–प्रत्येक रोपट्यातून दादा, तू पुन्हा नव्याने श्वास घेशील,
–मातोश्रीच्या या वसाहतून, तू कायम आमच्यात राहशील !
– मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड.

## डोळे उघडा....

यात समावेश आहे.

मात्र प्रत्यक्षात नागरिकांना सेवा मिळविताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करत, दाखविण्यात येणारे 'रेकॉर्ड' आणि वास्तव यामध्ये मोठी दरी असल्याचे ढवळे यांनी नमूद केले. नागरिकांच्या तक्रारींचा प्रामाणिक निपटारा करूनच प्रशासनाने पुरस्कारांचा दावा करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# माजलगावात वाळू माफियांचा हैदोस ? रात्रीच्या अंधारात ट्रकांची धडाकेबाज वर्दळ; प्रशासन झोपेत का ?

● महसूल प्रशासन मौनात, पोलीसांची संशयास्पद डोळेझाक–अनधिकृत वाळू वाहतूक मोकाट ?

● रात्री ट्रकांची दणदणाट वर्दळ ; प्रशासन मुद्दाम गप्प बसलंय का ?

● तक्रारींचा ढीग, कारवाई शून्य–वाळू माफियांना अभय कोणाचं ?

● नियम धाब्यावर, यंत्रणा गप्प–अनधिकृत वाळू उत्खननाला मूक संमती ?

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यात अनधिकृत वाळू उत्खनन आणि वाहतुकीने पुन्हा एकदा डोके वर काढल्याची गंभीर चर्चा सुरू झाली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वाळूने भरलेले ट्रक गावातील आणि नदीकाठच्या मार्गांवरून धावताना दिसत आहेत. या हालचाली इतक्या उघडपणे सुरू असताना संबंधित यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

विशेष म्हणजे, ही वाहतूक मुख्यतः उशिरा रात्री ते पहाटेच्या दरम्यान होत असल्याचे सांगितले जात आहे. काही ठिकाणी तर ट्रकांचे ताफेच दिसत असून, स्थानिकांच्या मते या कामात काही प्रभावशाली घटकांचा हात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र याबाबत अधिकृत स्तरावर कोणतीही स्पष्ट माहिती किंवा कारवाईची नोंद अद्याप समोर आलेली नाही. परिसरातील शेतकरी आणि रहिवाशांना या प्रकारामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांची दुरवस्था, धुळीचे प्रदूषण आणि रात्रीची प्रचंड वाहतूक यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. याशिवाय, अनधिकृत वाळू उपशामुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. स्थानिकांनी असा आरोप केला आहे की, वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित ती कठोर कारवाई होत नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणात प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. काही जणांच्या मते, जर सर्व काही नियमांनुसार होत असेल, तर मग ही वाहतूक लपूनछपून रात्रीच का केली जाते, असा सवाल उपस्थित होतो. दरम्यान, या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. संबंधित पोलीस, महसूल आणि खनिज विभागाने संयुक्त कारवाई करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकंदरीत, माजलगावात सुरू असलेल्या या कथित वाळू वाहतुकीच्या प्रकाराने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. आता तरी संबंधित यंत्रणा जागी होऊन या प्रकाराला आळा घालते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## जिल्ह्यातील नागरिकांनी जास्तीत जास्त स्व–गणना करावी : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



**नांदेड । प्रतिनिधी**

भारताची जनगणना–२०२७ ही पहिली डिजिटल जनगणना लवकरच सुरू होणार आहे. जिल्ह्यातील सर्व नगारिकांनी येत्या १ ते १५ मे पर्यंत स्व–गणना करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. जिल्ह्यातील प्राचार्य, गटशिक्षणाधिकारी, एनएसएस व एनसीसीचे समुपदेशक यांची बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन भवन येथे संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. स्व–गणनेची माहिती शि.लशर्पीि.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावर १ ते १५ मे २०२६ पर्यंत भरता येईल. नोंदणी केलेली संपूर्ण माहिती ही गोपनीय राहणार असून स्व–गणनेत नांदेड जिल्हा प्रथम येईल, अशा पद्धतीने सर्वांनी स्व–गणनेचे नियोजन करुन जास्तीत जास्त स्वगणना करावी, असेही आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## डॉ.गणेश ढवळे मातृभूमी समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

दिवंगत सामाजिक कार्यकर्ते हॅरीसन फ्रान्सिस रेड्डी यांच्या संकल्पनेतून सन २०२१ साली चंपावतीरत्न पुरस्कार विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गुणवंतांना देण्याचा त्यांचा मानस होता. मात्र त्यांचे अकाली निधन झाल्याने त्यांचे स्वप्न अधुरे राहिले होते. हॅरीसन फ्रान्सिस रेड्डी यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मातृभूमी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, सामाजिक कार्यकर्ते प्रवीणकुमार पालीमकर व मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांच्या वतीने २४ एप्रिल २०२६ शुक्रवार रोजी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ सामाजिक



कार्यकर्त्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मान्यवरांच्या उपस्थितीत विविध क्षेत्रातील गुणवंतांचा चंपावती रत्न व मातृभूमी रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांना देखील राज्यस्तरीय मातृभूमी समाजरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. परंतु कार्यक्रमातून काही कारणास्तव त्यांना लिंबागणेशला जावे लागल्याने त्यांचा सोमवार दि. २७ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन स्थळी सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय मातृभूमी समाजरत्न पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य डी.जी.तांदळे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार, शिवाजी कोण होता ? हे पुस्तक व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. संजय तांदळे, प्रवीणकुमार पालीमकर, डॉ. लक्ष्मण पवळ, शेख युनूस चऱ्हाटकर, रामनाथ खोड, गणेश मस्के, माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक, रामधन जमाले, शेख मुबीन, बाजीराव ढाकणे, अशोक ढोले, शिवाजी हिंदोळे आदींसह सामाजिक कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.



*मुंबई : पनवेल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना केंद्रीय मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, गौतम सोनवणे, डॉ. विजय मोरे, प्रभाकर कांबळे, आकाश आहिर आदी.*

## चौकीदार भरती जाहिरात दुरुस्त करण्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांचे निर्देश



**मुंबई । प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभागाच्या नाशिक येथील आयुक्तालयाने २७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या चौकीदार पदांच्या जाहिरातीत अनुसूचित जमाती (एसटी) संवर्गासाठी एकही पद राखीव नसल्याचे समोर आल्यानंतर आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी तातडीने हस्तक्षेप करत संबंधित अधिकाऱ्यांना जाहिरात दुरुस्तीचे निर्देश दिले.

मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विभागाचे सचिव व आयुक्त यांच्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. या बैठकीत २० नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा सखोल अभ्यास करून जाहिरात दुरुस्त करण्याचे आणि तत्काळ सुधारित जाहिरात प्रसिद्ध करण्याचे आदेश देण्यात आले. मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, चौकीदार पदांच्या भरतीसाठी शुद्धीपत्रक काढण्यात येणार असून, अनुसूचित जमाती उमेदवारांवर होणारा अन्याय दूर केला जाणार आहे. तसेच, अट्रॉसिटी कायद्यांतर्गत पीडितांच्या वारसदारांना शासकीय सेवेत संधी देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागातील वर्ग–४ मधील १५१ पदे पुनरुज्जीवित करून एकदाच विशेष बाब म्हणून या पदांवर नियुक्त्या केल्या जाणार आहेत. या सुधारित प्रक्रियेत अनुसूचित जमाती उमेदवारांसाठी पदे राखीव ठेवण्यात येणार आहेत. अनुसूचित जमाती उमेदवारांवर कोणताही अन्याय होऊ दिला जाणार नाही. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले आहे.

## लोकसेवा हक्क कायदा २०१५ अंतर्गत महाविद्यालयात शपथविधी कार्यक्रम

**मुंबई । प्रतिनिधी**

नवगण शिक्षण संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाच्या वतीने लोकसेवा हक्क कायदा २०१५ अंतर्गत विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना जागरूक करण्यासाठी शपथविधी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खाकरे होते. यावेळी पीजी डायरेक्टर डॉ. सुधाकर वनवे, महाविद्यालयाचे कार्यालय अधीक्षक (ओ.एस.) श्री. चंद्रकांत पवार तसेच सीनियर हेड श्री. बबन घोडके उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित सर्व विद्यार्थी, प्राध्यापक



व कर्मचारी यांनी लोकसेवा हक्क कायद्याचे पालन करण्याची व नागरिकांना वेळेत सेवा देण्याबाबत जागरूक राहण्याची शपथ घेतली. प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांनी आपल्या मनोगतात लोकसेवा हक्क कायद्याचे महत्त्व स्पष्ट केले व विद्यार्थ्यांनी समाजात जनजागृती करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. अमर आलदे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजवंदन पोलीस कवायत मैदानावर १ मे रोजी सकाळी शासकीय समारंभ

**नांदेड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस समारंभ शुक्रवार १ मे २०२६ रोजी वजिराबाद पोलीस मुख्यालय कवायत मैदान, नांदेड येथे सकाळी ८ वा. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभ होणार आहे. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.



या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था, आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ७.१५ पुर्वी किंवा ९ वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बँग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिनानिमित्त विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पध्दतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृहविभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही, याची दक्षता संबंधितानी घ्यावी, असेही आवाहनही केले आहे.

## मराठवाड्यातील सिंचनाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशिल – जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जलव्यवस्थापन अधिक गतिमान, लोकाभिमुख आणि जनसहभागातून प्रभावी करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' उपक्रमाअंतर्गत 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलयात्रे'चे छत्रपती संभाजीनगर मध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले. लोकांचा मिळत असलेला प्रतिसाद पाहाता जलयात्रा आता लोकचळवळ झाली असून मराठवाड्यातील सिंचनाचे प्रश्न निर्धारीत वेळेत सोडवण्यासाठी शासन प्रयत्नशिल असल्याची ग्वाही जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मस्थान श्रीक्षेत्र चोंडी आणि गोदावरीचे उगमस्थान श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि चौंडी येथून एकाच वेळी या दोन ठिकाणांहून जलयात्रेचा शुभारंभ दि.२५ रोजी करण्यात आला.

## पुरातन वास्तूंच्या विकासासाठी स्थळ व्यवस्थापन नियोजन आराखडा तयार करावा - सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी जिल्हयातील पुरातन वास्तूंचा ठेवा जतन करणे, त्यांचा पर्यटनदृष्ट्या सर्वांगीण विकास करणे आणि दीर्घकालीन अस्तित्व टिकवण्यासाठी 'स्थळ व्यवस्थापन नियोजन आराखडा' तयार करावा, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले. मुंबई येथील पु.



ल. देशपांडे कला अकादमीच्या सभागृहात आयोजित बैठकीमध्ये चारठाणा येथील पुरातन मंदीर आणि जिल्हयातील ऐतिहासिक वास्तूंच्या जतन व संवर्धन विकासाबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस ऊर्जा राज्यमंत्री तथा परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर, सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व संचालनालयाचे संचालक तेजस गर्ग, संचालक विभीषण चवरे, उपसचिव श्री. सावंत आदी उपस्थित होते. तसेच परभणीच जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी बैठकीत दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे सहभाग घेतला. परभणी जिल्ह्याच्या जिंतूर तालुक्यातील चारठाणासह जिल्हयातील ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी जिल्हयाच्या एकत्रित प्रकल्प विकास आराखड्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मंत्री ड. शेलार देताना म्हणाले की, चारठाणा येथील मंदिर परिसरामध्ये झालेली अतिक्रमणे हटवण्यात यावीत. या कामासाठी जर भूसंपादनाची आवश्यकता असेल, तर जिल्हा प्रशासनाने समन्वय साधून ही प्रक्रिया त्वरित राबवावी. संपूर्ण विकास कार्यक्रमा अंतर्गत जिल्हयाचा प्रकल्प विकास आराखडा तयार करावा आणि यासाठी जिल्हा नियोजन समिती व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या निधीतून समन्वयाने आर्थिक तरतूद करावी, असेही मंत्री ॲड. शेलार यांनी स्पष्ट केले.

## आर्वीत आजपासून हरिनाम सप्ताह; शिवमहापुराण कथेचा रंगणार सोहळा

### नामवंत कीर्तनकारांची लाभणार उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

शिरुर तालुक्यातील आर्वी येथे श्री संत कुलभूषण महात्मा नगद नारायण महाराज यांच्या कृपेने आणि ब्रम्हलीन स्वामी निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने भव्य 'वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह' व 'शिवमहापुराण कथे'चे आयोजन करण्यात आले आहे. आज बुधवार पासून या भक्तिसोहळ्याला प्रारंभ होणार असून, ६ मे पर्यंत हा सोहळा रंगणार आहे. या सप्ताहाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'शिवमहापुराण कथा'. प्रसिद्ध कथाकार ज्ञानेश्वर महाराज कोटुळे हे आपल्या रसाळ वाणीतून दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत शिवकथेचे निरूपण करणार आहेत. कथेसोबतच सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण आणि १० ते १२ गाथा भजन असे धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक म्हणून गणेश महाराज नावडे हे सेवा बजावणार आहेत.

सप्ताहामध्ये दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा होणार आहे. यामध्ये २९ एप्रिल रोजी माणिकराव महाराज मांगुळकर (जिंतूर), ३० एप्रिल रोजी विवेक महाराज शास्त्री (सिद्धेश्वर संस्थान, शिरूर), १ मे रोजी महंत शिवाजी महाराज (नारायणगड), २ मे रोजी योगीराज महाराज (रामगड), ३ मे रोजी सुशांत महाराज पवने (आळंदी), ४ मे रोजी लक्ष्मण महाराज हिंगे (आळंदी) आणि ५ मे रोजी पांडुरंग महाराज शास्त्री (करंजवन) यांची कीर्तने होतील.

बुधवार, ६ मे २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत मत्स्येंद्रनाथ संस्थानचे मठाधिपती स्वामी जनार्दन महाराज यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. उपस्थितीचे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र

▸▸ बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ ▸▸ Page 4

## कवडगाव येथे सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे काही महिन्यापूर्वी चोरीचे प्रमाण वाढले होते यामध्ये अनेक दरोडेखोरांनी दरोडा टाकून लाखो रुपयाची चोरी करून पसार झाले होते या घटनेचा सुगावा अजून देखील लागला नाही गावामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. यापुढे चोरीचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी गावचे सरपंच शेख बशीर भाई यांनी गावांमध्ये विद्युत रोषणाई तसेच महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आणि गावातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले यामुळे ▶▶ उर्वरित पान २ वर

# तारकेश्वर गडाच्या विकासासाठी कटिबद्ध आ. सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र तारकेश्वर गड (महिंदा, ता. आष्टी) येथे श्री संत गुरुवर्य नारायण बाबा महाराज यांच्या १५ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित सप्ताह सांगता कार्यक्रमात आ.सुरेश धस यांनी उपस्थित राहून भाविकांशी संवाद साधला.

ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या धार्मिक सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थिती लाभली. यावेळी आमदार धस यांनी श्री तारकेश्वराचे दर्शन घेत गुरुवर्य नारायण बाबा महाराज यांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाले. गुरुवर्य बाबांच्या आशीर्वादामुळेच मला जनसेवेची संधी मिळाली, अशी कृतज्ञ भावना व्यक्त केली. तारकेश्वर गडावर प्रत्येक वेळी



येताना त्या आशीर्वादांची जाणीव नव्याने होत,असल्याचेही यावेळी आ.धस यांनी यावेळी सांगितले.

तारकेश्वर गड हा आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या सीमेवर असून अत्यंत महत्त्वाचा आणि भक्तांचे श्रद्धास्थान असून पाथर्डी,शेवगाव, शिरूर कासार आणि आष्टी परिसरातील हजारो भाविक येथे नियमित दर्शनासाठी याठिकाणी येतात.या पवित्र स्थळी जाण्यासाठी रस्त्याची अडचण आहे हे मी मान्य करत असल्याचे सांगत भाविकांच्या या अडचणीची गंभीर दखल घेत आमदार धस यांनी राज्य शासनाच्या हॅम योजनेअंतर्गत महिंदा ते खडकत या रस्त्याच्या सिमेंट काँक्रेटीकरणाच्या कामास मंजुरी मिळाल्याची माहिती दिली. तसेच येत्या वर्षभरात या कामास प्रत्यक्ष सुरुवात होईल, असा ठाम विश्वास त्यांनी नागरिकांना दिला. या निर्णयामुळे तारकेश्वर गडाकडे जाणाऱ्या मार्गाचा कायापालट होणार असून भाविकांची सोय मोठ्या प्रमाणात होणार असल्याचे सांगितले. तसेच गडाच्या सर्वांगीण विकासासाठी मी नेहमी कटिबद्ध असल्याचेही आ.धस यांनी सांगितले.या प्रसंगी ह.भ.प. तुकाराम महाराज मुंढे, ह.भ.प. रोहिदास महाराज गर्जे, ह.भ.प. अनिल देवळकर महाराज यांच्यासह राहुल राजळे, विक्रम राजे भोसले, गणेश आव्हाड, अंकुश चितळे, अनिल मोहिते, दिनकर तांदळे, आजिनाथ सानप, सरपंच दहिफळे, माणिक दहिफळे, विठ्ठल गर्जे, शंकर मिसाळ, विष्णु दहिफळे, वसंत मिसाळ तसेच पंचक्रोशीतील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस अधिकाऱ्याचा 'बी' समरी अहवाल नामंजूर

### अखेर पिडीतेस मिळाला न्याय! केज जिल्हा विशेष व सत्र न्यायालयाचे पुन्हा तपास करण्याचे आदेश

**केज । प्रतिनिधी**

थेटेगव्हाण, ता. धारूर, जिल्हा बीड येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेतील महिला कर्मचाऱ्याच्या विनयभंग आणि अत्याचार प्रकरणात पोलिसांनी न्यायालयात पुराव्याचा अभाव, तपास लागला नाही, खोटी तक्रार व ईतर संदर्भ देत दाखल केलेला बी समरी अहवाल



केज येथील जिल्हा विशेष व सत्र न्यायालयाने नामंजूर केला आहे. तसेच, या गुन्ह्याचा पूर्ण तपास पुनः करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले असून, तब्बल तीन वर्षांच्या न्यायालयीन संघर्षानंतर पीडितेला न्याय मिळाला आहे.

सविस्तर वृत्त असे की, दिनांक २५-०२-२०२३ रोजी थेटेगव्हाण, तालुका धारूर, जिल्हा बीड येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा येथे महिला कर्मचारी सोबत विनयभंग व अत्याचार, गुन्हेगारी कृत्य केल्याची घटना घडल्यासंदर्भात दिंद्रुड पोलीस स्टेशन येथे दिनांक ०६-०३-२०२३ रोजी प्रभारी मुख्याध्यापक यांच्या विरोधात गुन्हा क्रमांक ४६/२०२३ हा भा.द.वी. कलम ३५४, ▶▶ उर्वरित पान २ वर

## सामुहिक विवाह सोहळ्यात विवाह करणाऱ्या दाम्पत्यांनी कन्यादान योजनेच लाभ घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सामूहिक विवाह सोहळ्यास प्रोत्साहन मिळावे या हेतूने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २००३-०४ या आर्थिक वर्षापासून कन्यादान योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हास्तरावर सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण बीड या कार्यालयामार्फत करण्यात येते. या योजने अंतर्गत स्वयंसेवी संस्था मार्फत आयोजित केलेल्या सामूहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह केलेल्या अनुसूचित



जाती व नवबौद्ध घटकातील दाम्पत्यांना प्रतिदाम्पत्य रुपये २०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते तसेच असा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस प्रतिदाम्पत्य रुपये ४,०००/- इतके अनुदान देण्यात येते. सामूहिक विवाह सोहळ्यात किमान १० दाम्पत्यांचे विवाह होणे अपेक्षित आहे. व्यक्तिगत पातळीवर केल्या जाणाऱ्या विवाह सोहळ्या मध्ये अनाठायी खर्च होऊ नये व सामूहिक विवाह सोहळ्यास प्रोत्साहन मिळावं यासाठी स्वयंसेवी संस्थांना असे सामूहिक विवाह सोहळे आयोजित करण्याचे तसेच अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील व्यक्तीना अशा विवाह सोहळ्यात विवाह करावे असे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त बीड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड या कार्यालयात संपर्क साधावा.

## सोमवारी लोकशाही दिन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ४ मे २०२६ रोजी सकाळी १०-०० वाजता या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या ▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परीक्षेत आदित्य फिजिओथेरपी कॉलेजचा डंका

● तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के

**बीड । प्रतिनिधी**



भगत माधवी प्रतीक्षा गवई सुरवसे माधुरी मोमीन रक्षंदा कसबे प्रतीक्षा कोळी प्रियांका सरवदे प्रीती समृद्धी शिर्के विशाल पवार

शहरातील आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाने आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणीत यश मिळवत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यामध्ये माधुरी बाळासाहेब सुरवसे हिने प्रथम क्रमांक पटकावला. माधवी सुधाकर भगत हिने द्वितीय, तर प्रतीक्षा अशोक गवई हिने तृतीय क्रमांक मिळवला. द्वितीय वर्षात प्रियांका विजयराव कोळी हिने प्रथम, प्रतीक्षा राजेंद्र कसबे हिने द्वितीय आणि रक्षंदा मोमीन हिने तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम वर्षात प्रीती शिवाजी सरोदे हिने प्रथम, विशाल मारुती पवार याने द्वितीय आणि समृद्धी शिर्के हिने तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. या विद्यार्थ्यांचे अभिनंदन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुका अद्याप सुरु आहे. दि.१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन आणि अमेरिका आणि इराण युध्दामुळे निर्माण झालेला इंधन तुटवडा महाराष्ट्रभर दिवसें दिवस वाढत आहे. त्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, वैयक्तीक आंदोलनकर्ते यांच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, ▶▶ उर्वरित पान २ वर

## कुस्ती स्पर्धेच्या अनुषंगाने बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, संभाजीनगर विभाग, संभाजीनगर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांचे द्वारा बीड येथे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या तांत्रिक साह्याने स्व. खाशाबा जाधव कुस्ती चषक स्पर्धा २०२५-२६ ही जुलै २०२६ महिन्यामध्ये बीड येथे भव्य स्वरूपात करण्याचे निश्चित.या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा, स्पर्धा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली दि. २१/०४/२६ रोजी आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत स्पर्धेच्या आयोजना



संदर्भातील विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. स्पर्धेसाठी राज्यातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने पुरुष व महिला खेळाडू, प्रशिक्षक, पंच व प्रशासकीय अधिकारी सहभागी होणार असून त्यांच्या निवास, भोजन, वाहतूक, सुरक्षा तसेच इतर मूलभूत सुविधांची काटेकोर व्यवस्था करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व संबंधीत यंत्रणांनी समन्वय साधून उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, बीड जिल्हा यांचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## अजित दादांच्या कर्तृत्वाला 'मातोश्री'ची अनोखी मानवंदना

### 'एक झाड एक जीवन' व संस्थेची सर्व नवीन कामे आता दर महिन्याच्या २८ तारखेलाच!

**बीड । प्रतिनिधी**

दि.२८.०४.२०२६ रोजी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि बीडचे माजी पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या निधनाला आज तब्बल तीन महिने पूर्ण झाले आहेत. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून दादांनी दिलेला विकासाचा भक्कम आधार आणि त्यांनी रुजवलेली विकासाची पाळेमुळे बीडकर कधीच विसरू शकत नाहीत. २८ जानेवारीच्या त्या काळ्या दिवशी नियतीने त्यांना अचानक हिरावून नेले असले तरी, त्यांचे विचार आणि जनसेवेचे कार्य बीडकरांच्या हृदयात आजही कायम जिवंत




आहे. याच दुःखातून सावरत, दादांच्या झंझावाती कार्यपद्धतीला आदरांजली वाहण्याचा ऐतिहासिक निर्णय 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड'ने घेतला आहे. संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणारे महत्त्वाकांक्षी 'एक झाड एक जीवन' अभियान आता दादांच्या सन्मानार्थ विशेष करून दर महिन्याच्या २८ तारखेलाच राबविण्यात येणार आहे. यापुढे केवळ वृक्षवाटपच नव्हे, तर संस्थेतर्फे हाती घेण्यात येणारे कोणतेही नवीन अभियान, समाजाच्या हिताचे उपक्रम किंवा नियोजित 'वृद्धाश्रम' उभारणीचे कार्य असो, अशा प्रत्येक नव्या आणि मंगल कार्याची सुरुवात आता दादांच्या पवित्र स्मृतिप्रीत्यर्थ केवळ २८ तारखेलाच केली जाईल. दादांच्या नावाने केवळ एका दिवसाचा कार्यक्रम करण्यापेक्षा, वृक्षारोपणातून एक कायमस्वरूपी जिवंत स्मारक उभे करण्याचा संस्थेचा मानस आहे. दादांनी जसा तळागाळातील माणसाला आधार दिला, तशीच ही झाडे भविष्यात वाढून निसर्गाला आणि समाजाला कायमस्वरूपी सावली देतील, असा ठाम आणि भावनिक संकल्प संस्थेने सोडला आहे.

याच संकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करत, बीड शहरातील विविध ठिकाणी, दुकानांमध्ये तसेच सकाळी 'मॉर्निंग वॉक'ला आलेल्या नागरिकांना प्रत्यक्ष भेटून एकूण १०० वृक्षांचे मोफत ▶▶ उर्वरित पान २ वर

# डोळे उघडा, बघा नीट; फसव्या रेकॉर्डचा बीडकरांना आलाय वीट !

### 90 टक्के निपटारा दाव्यावर प्रश्नचिन्ह: डॉ. गणेश ढवळे



**बीड । प्रतिनिधी**

न्यायासाठी उपोषणार्थी आणि आंदोलनकर्त्यांची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वर्षभर रेलचेल सुरू असताना, दुसरीकडे ९० टक्के अर्जांचा विहित कालावधीत निपटारा झाल्याबद्दल मिळणारे पुरस्कार हे वास्तवाशी विसंगत असल्याची तीव्र प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी व्यक्त केली आहे. आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय या म्हणीचा प्रत्यय बीडकरांना येत असल्याचा आरोप त्यांनी केला.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा २८ एप्रिल २०१५ पासून राज्यात लागू करण्यात आला. या कायद्याचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांना शासनाच्या विविध विभागांकडून मिळणाऱ्या सेवा पारदर्शक, जलद आणि ठरलेल्या कालमर्यादेत उपलब्ध करून देणे हा आहे. या अंतर्गत आतापर्यंत ४८६ पेक्षा अधिक सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत.

या कायद्यानुसार अर्ज केल्यानंतर ठराविक वेळेत सेवा मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे. विलंब झाल्यास किंवा सेवा नाकारल्यास प्रथम व द्वितीय अपील करण्याची तरतूद आहे. महसूल विभागातील उत्पन्न, अधिवास, वय, राष्ट्रीयत्व, जात प्रमाणपत्र, सातबारा उतारा; पोलिस विभागातील चारित्र्य प्रमाणपत्र व परवाना सेवा; अन्न व नागरी पुरवठा विभागातील रेशनकार्ड; तसेच शिक्षण विभागातील शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व शिष्यवृत्ती सेवा अशा विविध सेवांचा ▶▶ उर्वरित पान २ वर